महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक :- एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/ २१ दिनांक:- २६ डिसेंबर, २०२२

## -:प्रसिध्दीपत्रक:-

विषय:- दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग मुख्य परीक्षा-२०२१

संदर्भ:- पूर्व परीक्षा जाहिरात क्र.२७०/२०२१ व मुख्य परीक्षा जाहिरात क्र.४८/२०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ०२ जुलै, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग मुख्य परीक्षा-२०२१ चा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ०१ नोव्हेंबर,२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. सदर निकालानुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ०९ जानेवारी, २०२३ ते १७ जानेवारी, २०२३ या कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुख्य कार्यालय, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षी कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई-४०००२१ येथे घेण्यात येणार आहेत. मुलाखतीचा तपशीलवार कार्यक्रम आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात आला आहे.

३. उमेदवारांना मुलाखत पत्रे त्यांच्या प्रोफाइलमध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहेत. मुलाखतीचा दिनांक बदलून देण्याची उमेदवाराची विनंती मान्य केली जाणार नाही.

४. संबंधित उमेदवारांना लघुसंदेशाद्वारे (एस.एम.एस.) कळविण्यात येत आहे.

५. उमेदवारांनी मुलाखतीस येताना मुलाखतपत्राची प्रत घेवून येणे व त्यातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६. मुलाखतीच्या वेळेस अर्जात दावा केल्या पृष्ठ्यर्थ आवश्यक सर्व मूळ प्रमाणपत्रे /सर्व मूळ गुणपत्रके/ निगडीत असणारी विहित प्राधिकाऱ्यांनी दिलेली मूळ अनुभव प्रमाणपत्रे इ. सादर करणे अनिवार्य आहे. त्यासाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही व अशा उमेदवारांची मुलाखत घेण्यात येणार नाही.

ठिकाण- मुंबई

उपसचिव, राजपत्रित परीक्षा
महाराष्ट्र लोकसेवा आयोग